# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ७८/२०२०

प्राप्त निर्देशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभुमीवर प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागामधील तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त सर्व परिसंस्थामधील अध्यापनाचे कामकाज शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० पासून पुढील आदेश मिळेपर्यंत बंद ठेवण्यात यावे. मात्र प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरु राहील.

ज्या विद्यार्थ्यांना सुट्टी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्याच्या घरामध्ये स्वतःला सुरक्षित ठेवतील. जे विद्यार्थी बाहेर गावाहून आले आहेत त्यांच्याबाबतीत ते अनावश्यक फिरणार नाही, ही स्पष्ट सुचना देण्यात यावी. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याच्या सुचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात राहतील त्यांच्याही निदर्शनास ही बाब आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरताना आढळल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही होऊ शकेल, याची जाणीव त्यांना द्यावी.

**विद्यापीठांच्या व इतर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. वर जे बंधन घालण्यात आलेले आहे किंवा शहरामध्ये न फिरण्याच्या ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.**

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१३७९
दिनाकं : १३/०३/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.